**तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ व सहायक सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय, यवतमाळ**

**सत्र खटला क्र. ८८/२०२४**
**निशाणी क्र. १४**

**महाराष्ट्र शासन तर्फे पो.स्टे. यवतमाळ ग्रामीण** **सरकारी अभियोक्ता**
**..वि..**
किशोर लक्ष्मण इंगळे + ३ **आरोपी.**

| | |
|---|---|
| शासन तर्फे साक्षीदार क्र. १ | |
| मी याद्वारे शपथपूर्वक सांगतो की – | |
| माझे संपूर्ण नाव | संदिप दादाराव मेहत्रे |
| वय अंदाजे ४० वर्षे | धंदा– नौकरी, पोलीस हवालदार, ब.क्र.नं.६१७ पो.स्टे, आर्णी |
| राहणार | आर्णी, ता. आर्णी, जि. यवतमाळ. |
| **सरतपासणी श्री. एन. एन. पांडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत शपथेवर सुरुः–** | |

सन २०२३ मध्ये मी पोलीस स्टेशन यवतमाळ ग्रामीण येथे पोलीस हवालदार म्हणून या पदावर कार्यरत होतो. माझा बक्कल नंबर ६१७ असा होता.

२. दिनांक ३०/१०/२०२३ रोजी मौजा किन्ही शिवारात शासन आपल्या दरबारी ह्या कार्यक्रमाचे नियोजन होते. सदर कार्यक्रमाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हे हजर राहणार होते. त्यामुळे, माननीय पोलीस अधिक्षक यांच्या आदेशान्वये त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात जन संख्या हजर राहणार असल्याने माझी नेमणूक त्याठिकाणी करण्यात आली होती. माझ्यासोबत पोलीस निरीक्षक प्रकाश तुनकलवार हे सुध्दा कर्तव्यावर हजर होते. त्यादरम्यान १५.४५ वाजता माननीय मुख्यमंत्री हे उपरोक्त कार्यक्रम स्थळी आले. कार्यक्रम सुरु असतांना १६.१५ वाजताच्या दरम्यान सभामंडपाच्या स्टेज समोरील मंडपाच्या मागील बाजूस चार इसमाने आरडाओरड करुन गोंधळ घालण्यास सुरुवात केली व ते नारेबाजी करत होते. तेव्हा स्थानीक गुन्हे शाखा येथील अधिकारी व अंमलदार हे साध्या वेषामध्ये तेथे हजर होते. आम्ही व स्थानीक गुन्हे शाखा येथील अधिकारी व अंमलदार यांनी चार व्यक्तींना ताब्यामध्ये घेतले व त्यांना सभामंडपाच्या बाहेर सुरक्षित स्थळी घेवून जात असतांना त्या चार व्यक्तींनी संगणमत करुन आम्हाला म्हटले की "तुम्ही

आम्हाला अडवणारे कोण आहे, आम्हाला सोडून द्या, नाहीतर तुम्हाला पाहून घेवू" अशी धमकी दिली. त्या चौघांनी आम्हाला व साध्या वेषातील अधिकारी व कर्मचा–यांना धक्काबुक्की केली व फौजदारी पात्र बलप्रयोग करुन आमच्यावर हमला केला. तेव्हा आम्ही त्यांना सुरक्षीत स्थळी नेवून त्यांचे नाव व गाव विचारले असता त्यांनी त्यांची नावे १) किशोर लक्ष्मण इंगळे, २) गजानन रामकृष्ण पाटील, ३) अशोक वासूदेव पुरी आणि ४) सुरज गंगाराम खोब्रागडे, असे सांगीतले. त्यावेळी आम्ही त्यांना तेथेच उपरोक्त चार जणांना स्थानबध्द केले.

३. वरील चार इसमांनी आम्ही शासकीय कर्तव्य बजावत असतांना आम्हाला व साध्या वेषातील पोलीस अधिकारी व कर्मचा–यांना धमकावून, धक्काबुक्की करुन फौजदारीपात्र बलप्रयोग करुन आमच्या शासकीय कामकाजामध्ये अडथळा निर्माण केला. सदर ठिकाणी मोठया प्रमाणात जन समूदाय असल्याने सदर ठिकाणी बंदोबस्त सुरळीत पार पाडणे असल्याने व रात्री पर्यंत उशिर झाल्याने, तसेच पोलीस स्टेशन परिसरात मराठा समाजाच्या आंदोलना संबंधी बंदोबस्तात व्यस्त असल्याने दुस–या दिवशी पोलीस स्टेशनला जावून मी लेखी कैफियत दिली. आता मला ती कैफियत दाखविण्यात आली, त्यावर माझी सही आहे व त्यातील मजकूर बरोबर आहे व **तो निशाणी क्रमांक १५ वर** आहे. प्रथम खबर अहवाल आता मला दाखविण्यात आला, त्यावर माझी सही आहे व त्यातील मजकूर बरोबर आहे व **तो निशाणी क्रमांक १६ वर** आहे. पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते. ज्या चार व्यक्तीनी वरील प्रमाणे कृत्य केले ते आज न्यायालयामध्ये आरोपी म्हणून हजर आहे.

**<u>उलट तपासणी आरोपींचे वकील श्री. पि. पि. किर्दक यांचे मार्फत सुरु –</u>**

४. हे म्हणणे खरे आहे की जेव्हा आम्ही कर्तव्यावर असतो त्यावेळेस त्याची नोंद स्टेशन डायरीला असते, तशीच त्याची नोंद पोलीस स्टेशनच्या ड्युटी रजिष्टरला सुध्दा राहते. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळावरील कार्यक्रमास अंदाजे ५० ते ६० हजार व्यक्ती उपस्थीत होत्या. हे म्हणणे खरे आहे की त्या कार्यक्रमामध्ये मोठया प्रमाणात

लाउडस्पीकर चालू होते. हे म्हणणे खरे आहे की मोठया संख्येमुळे लोक उपस्थित असल्यामुळे त्या लोकांचा तसेच लाउडस्पीकरचा आवाज होता व त्यामुळे कोणाचाच आवाज कोणालाही ऐकू जात नव्हता. मला माहिती नाही की मुख्यमंत्र्यांच्या सभा मंडपासमोर महत्वाच्या व्यक्तींना बसण्याकरीता व्यवस्था होती व त्याच्या पासेस सुध्दा दिल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की तेथे पत्रकारांना बसण्याकरीता व्यवस्था होती. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळावर महिला देखील मोठया प्रमाणात उपस्थित होत्या. मला माहिती नाही की पोलीस निरीक्षक प्रकाश तुनकलवार यांची नेमणूक अति महत्वाच्या व्यक्तींच्या जवळ केलेली होती. हे म्हणणे खरे नाही की अति महत्वांच्या व्यक्तींच्या बसण्यासंबंधीच्या व कार्यक्रमाच्या नियोजनाच्या सर्व फाईल श्री. तुनकलवार यांनी मला त्यावेळी दिल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की मी त्यामुळे स्टेज समोरील भागामध्ये अति महत्वांच्या व्यक्तींना बसण्याच्या ठिकाणी त्यावेळी मी, श्री तुनकलवार यांच्यासोबत हजर होतो. हे म्हणणे खरे नाही की मुख्यमंत्री दुपारी १२.३० वाजता तेथे आले होते. मला माहिती नाही की ज्यावेळी मुख्यमंत्री येतात त्यावेळी विरोधी पक्षाच्या नेत्यांना कार्यकर्त्यांना स्थानबध्द केले जाते. मला माहिती नाही की आरोपींना त्यामुळे सकाळी ९.०० वाजता स्थानीक गुन्हे शाखेने स्थानबध्द केले होते. मला माहित नाही की दिनांक ३०/१०/२०२३ रोजी आरोपींना सूचनापत्र देवून सोडून देण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की आरोपींना त्यांच्या घरुन सकाळी ९.०० वाजता स्थानीक गुन्हे शाखेने स्थानबध्द करुन पोलीस स्टेशनला आणले होते व त्यामुळे मला आरोपींची नावे माहिती आहे व कार्यक्रम झाल्यावर संध्याकाळी ६.०० वाजता आरोपींना सोडून देण्यात आले होते.

५. मला माहिती नाही की सभा मंडपामध्ये सि.सि.टिव्ही. लावलेले होते किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की दिनांक ३०/१०/२०२३ रोजी मी कर्तव्यावर हजर होतो. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगत आहे की "कार्यक्रम

*सुरु असतांना १६.१५ वाजताच्या दरम्यान सभामंडपाच्या स्टेज समोरील मंडपाच्या मागील बाजूस चार इसमाने आरडाओरड करुन गोंधळ घालण्यास सुरुवात केली व ते नारेबाजी करत होते, तेव्हा स्थानीक गुन्हे शाखा येथील अधिकारी व अंमलदार हे साध्या वेषामध्ये तेथे हजर होते, आम्ही व स्थानीक गुन्हे शाखा येथील अधिकारी व अंमलदार यांनी चार व्यक्तींना ताब्यामध्ये घेतले व त्यांना सभामंडपाच्या बाहेर सुरक्षित स्थळी घेवून जात असतांना त्या चार व्यक्तीनी संगणमत करुन आम्हाला म्हटले की ''तुम्ही आम्हाला अडवणारे कोण आहे, आम्हाला सोडून द्या, नाहीतर तुम्हाला पाहून घेवू" अशी धमकी दिली, त्या चौघांनी आम्हाला व साध्या वेषातील अधिकारी व कर्मचा-यांना धक्काबुक्की केली व फौजदारी पात्र बलप्रयोग करुन आमच्यावर हमला केला, तेव्हा आम्ही त्यांना सुरक्षीत स्थळी नेवून त्यांचे नाव व गाव विचारले असता त्यांनी त्यांची नावे १) किशोर लक्ष्मण इंगळे, २) गजानन रामकृष्ण पाटील, ३) अशोक वासूदेव पुरी आणि ४) सुरज गंगाराम खोब्रागडे, असे सांगीतले. त्यावेळी आम्ही त्यांना तेथेच उपरोक्त चार जणांना स्थानबध्द केले, वरील चार इसमांनी आम्ही शासकीय कर्तव्य बजावत असतांना आम्हाला व साध्या वेषातील पोलीस अधिकारी व कर्मचा-यांना धमकावून, धक्काबुक्की करुन फौजदारीपात्र बलप्रयोग करुन आमच्या शासकीय कामकाजामध्ये अडथळा निर्माण केला ".*

६. मी आरोपींचे आधारकार्ड तपासले नाही. हे म्हणणे खरे आहे की सभामंडपाच्या समोर अंदाजे ९ ते १० भागांमध्ये बसण्याची व्यवस्था होती. आरोपींची ओळखपरेड करण्यात आली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की आज मी पहिल्यावेळेस आरोपींना न्यायालयामध्ये पाहत आहे. मला आठवत नाही की या कार्यक्रमाच्या वेळेस संजय राठोड हे पालकमंत्री होते. हे म्हणणे खरे आहे की मला माझ्या वरिष्ठांच्या आदेशाचे पालन करावे लागते. हे म्हणणे खरे नाही की ठाणेदारांच्या सांगण्यावरुन मी आरोपींच्या विरोधात तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की आरोपींनी माझ्यासोबत व इतर

पोलीसांसोबत वाद घातला नाही, शिवीगाळ केली नाही, तसेच धक्काबुक्की केली नाही व फौजदारी पात्र बलप्रयोग केला नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या वरिष्ठांच्या सांगण्यावरुन मी आरोपींना खोटया केसमध्ये गोवले. हे म्हणणे खरे नाही घटनेच्यावेळी मी कर्तव्यावर हजर नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की मी समजून उमजून विचारपूर्वक खोटी तक्रार दिली व त्यामुळे मला तक्रार/कैफियत देण्यास विलंब झाला. हे म्हणणे खरे नाही की कैफियत देण्यास झालेल्या विलंबाचे कारण मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपासणी – काही नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

(पी.एस.इंगळे)
दिनांक – ०२/०१/२०२६ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.